3 र्‍या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६१ वा • गुरूवार, ता. ०४ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


## सिगारेटवरील वाढीव अबकारी कर राज्यांनाही मिळणार- वित्तमंत्री सीतारामन

नवी दिल्ली । रयत समाचार

लोकसभेत ता. ३ डिसेंबर रोजी केंद्रीय अबकारी (दुरुस्ती) विधेयक २०२५ मंजूर झाले असून, सिगारेटवर वाढीव अबकारी कर आकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या वाढीव कराबाबत काही खासदारांनी उपस्थित केलेल्या शंकांवर केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. सीतारामन म्हणाल्या की, सिगारेटवरील कर वाढ हा 'सेस' नसून अबकारी कर आहे. त्यामुळे हा महसूल विभाज्य निधीमध्ये जाईल आणि राज्यांनाही त्यांच्या हिश्श्याचा हिस्सा मिळेल. वित्तमंत्री म्हणाल्या, ''हा नवीन कर नाही आणि केंद्र सरकार काही अतिरिक्त घेऊन जात नाही. जीएसटीपूर्व काळात सिगारेटवर अबकारी जास्त होता. जीएसटी नंतर तो नाममात्र ठेवण्यात आला, कारण त्यावर भरपाई सेस लागू होता.''कोविड काळातील राज्यांना दिलेल्या भरपाईसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड पूर्ण झाल्यानंतर भरपाई सेस संपुष्टात येणार आहे. त्यामुळे सिगारेटवरील कराचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून केंद्राने मूळ अबकारी कर वाढवण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही खासदारांनी बीडी कामगारांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली होती. यावर उत्तर देताना सीतारामन म्हणाल्या, ''बीडीवरील एकाही पैशाचा कर वाढवलेला नाही.' यासोबतच बीडी कामगारांसाठी आरोग्य सुविधांपासून घरकुल अनुदान, शैक्षणिक शिष्यवृत्ती अशा विविध योजना सरकार राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. वित्तमंत्र्यांनी सांगितले की, प्री-जीएसटी काळात तंबाखूवर दरवर्षी कर वाढवण्याची पद्धत होती आणि तंबाखू शेतीचे दुष्परिणाम लक्षात घेता शेतकऱ्यांना इतर पर्यायी पिकांकडे वळवण्याचे प्रयत्न सुरु आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत २०१५ पासून १० मोठ्या तंबाखू उत्पादक राज्यांमध्ये पीक विविधीकरण कार्यक्रम राबवला जात असून, २०१८ ते २०२१-२२ दरम्यान १.१२ लाख एकर जमीन तंबाखू शेतीतून इतर पिकांकडे वळवण्यात आली आहे.

## 'राजभवन'चे 'महाराष्ट्र लोकभवन' नामांतर

मुंबई । रयत समाचार



केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नामांतर करून आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला आवश्यक निर्देश दिले. राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोककल्याणाभिमुख करण्याच्या हेतूने घेतलेला हा निर्णय दिशादर्शक आणि परिवर्तनशील असल्याचे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांनी व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार, 'लोकभवन' आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान किंवा प्रशासनिक कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, सामाजिक संस्था, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग वाढविणारे एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विकसित होणार आहे. राजभवनाला लोकांशी अधिक जोडणारा हा निर्णय पुढील काळातील संवादात्मक प्रशासनाला नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## वृक्षतोडीवरून वाद, फडणवीसांचा दावा
### गुगलच्या जुन्या इमेजमध्ये झाडंच नव्हती

मुंबई । रयत समाचार

कुंभमेळ्यासाठी नाशिकमधील तपोवन परिसरात झाडांची कत्तल सुरू झाल्यानंतर निर्माण झालेल्या तीव्र आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. ''तपोवनातील झाडं कापणं योग्य नाही; परंतु वास्तवाचा विचार करावा लागतो,'' असे सांगत त्यांनी परिस्थितीचे तर्कशुद्ध विश्लेषण मांडले.



फडणवीस म्हणाले की, २०१५१६ मधील गुगल इमेजमध्ये या भागात जवळजवळ कोणतीही झाडं नव्हती, तर राज्य सरकारच्या ५० कोटी वृक्षारोपण मोहिमेत महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात रोपटी लावली होती. ''आज साधुग्रामसाठी आवश्यक जागा उपलब्ध नाही. झाडांची दाटी वाढल्याने जागेची संरचना बदलली आहे,'' असे ते म्हणाले. मात्र, त्यांनी मोठ्या झाडांचे स्थानांतर करण्याचा पर्यायही उपलब्ध असल्याचे नमूद केले कुंभमेळा ही ''सनातन परंपरेचा प्राचीन सोहळा'' असल्याचे स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, सरकार विनाकारण वृक्षतोड करणार नाही, आणि आवश्यक तेवढीच झाडं कापली जातील. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी 'क्लीन गोदावरी' मोहीमही हाती घेतली जाईल, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सौम्य पण ठाम भूमिका घेत समोपचाराने तोडगा काढण्याचे आवाहन केले. अभिनेते सयाजी शिंदे यांनी घेतलेली पर्यावरणपूरक भूमिका योग्य असल्याचे ते म्हणाले. ''विकासाबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

तपोवन परिसरातील झाडे वाचवण्यासाठी नागरिक गेल्या काही दिवसांपासून आक्रमकपणे आंदोलन करत आहेत. झाडांच्या बदली पाचपट जागा उपलब्ध असेल, तर साधुग्राम दुसरीकडे हलवावा, अशी मागणी काही स्थानिक नागरिकसंघटनांकडून आहे. या संपूर्ण वादातून, नाशिकसाठी आणि राज्यासाठीपर्यावरण व विकास यांच्यात योग्य संतुलन साधने सरकारला जमणार आहे का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## इंडी जर्नल मीडिया कॉनक्लेव्हची तिसरी आवृत्ती २० डिसेंबरला




पुणे । रयत समाचार

इंडी जर्नल आणि पुणे कलेक्टिव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने इंडी जर्नल मीडिया कॉनक्लेव्हची तिसरी आवृत्ती येत्या शनिवारी ता.२० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येत आहे. 'संवाद' ही यंदाची मुख्य थीम असून देशातील विविध गंभीर आणि ज्वलंत प्रश्नांवर सखोल आणि सर्वसमावेशक चर्चेचा मंच या कॉनक्लेव्हमधून तयार होणार आहे.या कार्यक्रमात देशभरातील २० पेक्षा अधिक मान्यवर पत्रकार, संपादक, माध्यमकर्मी आणि विविध क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वे सहभागी होणार असून विविध विषयांवर व्यापक चर्चा होणार आहे. त्यात देशातील वाढते कृषी संकट. भाषिक व संघराज्य संबंधाचे प्रश्न. जागतिक स्तरावरील संघर्ष, युद्धस्थिती आणि मानवी अरिष्टे. लिंगभाव, लैंगिक न्याय आणि सुरक्षितता आदींचा समीवेश आहे. हा संवाद अधिक व्यापक करण्यासाठी आयोजकांनी सर्वांना आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रम ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सभागृह, गंज पेठ, पुणे येथे पार पडणार आहे. कार्यक्रमासाठी पास नोंदणी आणि सविस्तर कार्यक्रमपत्रिका आयोजकांनी सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून दिली आहे. पास बुकिंग https://bit.ly/BookMyPass कार्यक्रमपत्रिका : https://mediaconclave.indiejournal.in/ संवादाच्या या महत्त्वाच्या मंचाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, तसेच या उपक्रमाची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सोन्याचे दर तेजीत
## चांदीचा नवा उच्चांक

नवी दिल्ली । रयत समाचार

देशांतर्गत बुलियन बाजारात बुधवारी सोने व चांदीच्या दरात पुन्हा एकदा लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली. चांदीने तब्बल ४,०३४ रुपयांची उसळी घेत नवा उच्चांक गाठला, तर सोन्यातही ९५७ रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनच्या माहितीनुसार, जीएसटीशिवाय चांदीचा दर १,७८,६८४ रुपये प्रति किलो तर जीएसटीसह १,८४,०४४ रुपये झाला आहे. कालचा २४ कॅरेट सोन्याचा दर १,२७,५९३ रुपये होता; त्यात आज वाढ होऊन १,२८,५५० रुपये प्रति तोळा असा दर नोंदविला गेला. २२ कॅरेट सोन्याचा जीएसटीसह दर १,२१,२८४ रुपये, तर १८ कॅरेट सोन्याचा जीएसटीसह दर ९९,३०५ रुपये झाला आहे.

या वर्षभरात सोन्याच्या दरात एकूण ५२,८१० रुपयांची वाढ झाली आहे; तर चांदीत तब्बल ९२,६६७ रुपयांची वाढ नोंदविण्यात आली आहे. जागतिक अस्थिरता, औद्योगिक वापरातील चांदीची वाढती मागणी आणि गुंतवणूकदारांचा सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे कलया कारणांमुळे दरवाढीचा कल अधिक मजबूत होताना दिसत आहे.

सोन्याने १७ ऑक्टोबर रोजी गाठलेल्या उच्चांकापेक्षा सध्या ते २,३२४ रुपयांनी स्वस्त आहे. २३ कॅरेट सोन्यात ९५३ रुपयांची वाढ होऊन दर १,२८,०३५ रुपये झाला. २२ कॅरेट सोन्यात ८७७ रुपयांची वाढ होऊन दर १,१७,७५२ रुपये (जीएसटीशिवाय) इतका झाला.

इंडियन बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशनदररोज दुपारी १२ वाजता आणि सायंकाळी ५ वाजता दर जाहीर करते.

## मोबाईलमध्ये 'संचार साथी' ॲप सक्तीने बसवण्याचा निर्णय अखेर मागे
### गोपनीयतेच्या सवालांनंतर केंद्राची माघार

नवी दिल्ली । रयत समाचार

केंद्र सरकारने मोबाईलमध्ये 'संचार साथी' ॲप प्री-इन्स्टॉल करण्याच्या आदेशावरून अखेर माघार घेतली आहे. सायबर गुन्हे, मोबाईल चोरी आणि फर्जी सिमकार्ड प्रकरणांना आळा घालण्यासाठी सर्व नव्या मोबाईलमध्ये हे सरकारी ॲप अनिवार्यपणे बसवावे आणि ते डिलीट करता येऊ नये, असा आदेश काही दिवसांपूर्वी दूरसंचार विभागाने मोबाईल उत्पादकांना दिला होता.

परंतु या आदेशाला तज्ज्ञ, नागरिकसंघटना आणि मोबाईल उत्पादकांकडून जोरदार विरोध झाला. ॲप अनिवार्य केल्यास नागरिकांच्या डिजिटल क्रियाकलापांवर सरकार नजर ठेवू पाहत असल्याचा आरोप सोशल मीडियावर आणि सायबर हक्क कार्यकर्त्यांकडून करण्यात आला. फोनवर




अनडिलीटेबल ॲप सक्तीने ठेवणे हे गोपनीयतेवर आघात असल्याचेही मत व्यक्त झाले.

वाढत्या वादानंतर केंद्राने हा निर्णय स्थगित करत आदेश मागे घेतल्याचे दूरसंचार विभागाने स्पष्ट केले. या निर्णयामुळे मोबाईल उत्पादक कंपन्यांना दिलासा मिळाला असून ॲप स्वेच्छेने डाउनलोड करण्याचा पर्याय कायम ठेवला जाईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे. सरकारने सायबर सुरक्षितता वाढवण्यासाठी हा उपाय सुचवला होता; मात्र गोपनीयतेवरील शंका आणि तांत्रिक अडचणींसमोर हा प्रस्ताव टिकाव धरू शकला नाही, अशी प्रतिक्रिया उद्योग वर्तुळातून व्यक्त होत आहे.

## 'राष्ट्रवीर'कार शामराव देसाई स्मृती पुरस्काराचे आज वितरण
### किशोर ढमाले आणि प्रा. प्रतिमा परदेशी यांना जाहीर

बेळगाव । प्रतिनिधी

**'राष्ट्रवीर' कार शामराव देसाई स्मृती पुरस्कार यंदा सत्यशोधक कार्यकर्ते किशोर ढमाले आणि विचारवंत प्रा. प्रतिमा परदेशी यांना संयुक्तपणे जाहीर करण्यात आला आहे.** हा पुरस्कार गुरूवारी ता.४ डिसेंबर रोजी खानापूर येथील छत्रपती शिवस्मारकात प्रख्यात इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. किशोर ढमाले हे १९८८ पासून सत्यशोधक शेतकरी सभेचे पूर्णवेळ कार्यकर्ते असून शेतकरी आंदोलन, आदिवासी हक्क चळवळ, कर्जमुक्ती व शेतीमाल भाव आंदोलन, दिल्ली शेतकरी आंदोलन आणि आदिवासी शेतकरी पायी मोर्चा अशा विविध लढ्यांत त्यांनी नेतृत्व केले आहे. प्रा. प्रतिमा परदेशी या पुण्यातील आप्पासाहेब जेधे महाविद्यालयात प्राध्यापक असून



सत्यशोधक विचार, स्त्रीमुक्ती, शिवइतिहास आणि संविधान विषयांवरील १५ पुस्तकांच्या लेखिका आहेत. त्या २००८ पासून 'सत्यशोधक जागर' मासिकाच्या संपादिका आहेत. या दांपत्याने सत्यशोधक विवाह करून प्रबोधनाची चळवळ उभारली असून त्यांना यापूर्वी विविध सन्मान प्राप्त झाले आहेत. पुरस्काराचे स्वरूप ₹२५,०००, सन्मानचिन्ह, घोंगडी व पुष्पहार असे आहे.


समितीचे सदस्य शिवाजीराव देसाई यांनी पुरस्काराची घोषणा केली असून ४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'अंधश्रद्धा निर्मूलक : क्रांतिसिंह नाना पाटील' पुस्तकाचे ६ डिसेंबरला प्रकाशन
### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त विशेष कार्यक्रम

सांगली । रयत समाचार

क्रांतिसिंह नाना पाटील लोक विद्यापीठ, विटा आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, विटा शाखेच्या विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच ॲड. सुभाष पाटील लिखित 'अंधश्रद्धा निर्मूलक : क्रांतिसिंह नाना पाटील' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रम ता.६ डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी १०:३० वाजता क्रांतिसिंह नाना पाटील सार्वजनिक वाचनालय, विटा, जिल्हा सांगली येथे होणार




आहे.

पुस्तकाचे प्रकाशन डॉ. हमीद दाभोलकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. अर्चना थोरात (प्रा. डॉ. एन. डी. पाटील विधी महाविद्यालय, ईश्वरपूर) असतील.

महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील योगदान, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रगत विचारांचा वारसा आणि सामाजिक परिवर्तनातील त्यांच्या भूमिकेचा घेतलेला वेध या पुस्तकातून प्रभावीपणे समोर येतो. समाजातील विवेकवाद, वैज्ञानिक दृष्टी आणि संविधानिक मूल्यांची जपणूक याबाबत या पुस्तकाचे योगदान महत्त्वाचे ठरेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या कार्यक्रमाचे प्रकाशन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती करत असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## ज्येष्ठ पत्रकार पन्नालाल सुराणा यांचे निधन

सोलापूर । रयत समाचार

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे निधन झाले. त्यांचे वय ९३ वर्ष होते. काल रात्री नळदुर्ग येथील 'अपना घर' येथे जेवणानंतर त्यांना उलटीचा त्रास झाला. त्यामुळे त्यांना सोलापुरातील एका सहकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. सुराणा यांनी मरणोत्तर देहदानाचा संकल्प केला असल्याने त्यांचा देह सरकारी रुग्णालयास दान करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. आयुष्यभर सामाजिक तसेच राजकीय कार्यासाठी त्यांनी वाहून घेतले होते. यासोबतच ते पत्रकारही होते. महाविद्यालयीन



शिक्षण झाल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली. मराठवाडा दैनिकाचे ते संपादक होते. शिक्षण, शेती, बेरोजगारी या विषयावर त्यांनी प्रचंड लेखन केले आहे. सुमारे ७० वर्षे ते देशाच्या राजकारणाचे आणि समाजकारणाच्या स्थितंतराचे साक्षीदार राहिले. चले जाव आंदोलनपासून ते स्वातंत्र्य चळवळीपर्यंत त्यानंतर स्वातंत्र्य ते आणीबाणी आणि त्यानंतर देशाच्या सामाजिक आणि राजकीय जडणघडणीतील महत्वाचा वाटा राहिला. जुना समाजवादी पक्ष, जनतापक्ष, अनेक पुरोगामी संघटना आणि जनआंदोलन यांच्या उभारणीमध्ये सुराणा यांचा मोलाचा वाटा आहे.

## जोदुटोणा करणाऱ्या मांत्रिकाला अटक
## डॉ.नीलम गोऱ्हे व अंनिस यांच्या प्रयत्नांना यश!

नाशिक । रयत समाचार

पंचवटी येथील नेहा पवार हिने सात पानी चिठ्ठी लिहून आत्महत्या केली होती.आत्महत्येच्या अनेक कारणांपैकी अंधश्रद्धा हे सुध्दा एक कारण होते.पंचवटी पोलीसांनी त्यादृष्टीने तपास करुन हिरवाडी येथुन एका मांत्रिकाला अटक केली असल्याची माहिती अंनिसचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी दिली आहे.

मयत नेहा पवार हिच्या आत्महत्येमागे कौमार्य चाचणी व जादुटोण्याचे कारण असुन त्याचा पोलीसांनी तपास करावा,असे महाराष्ट्र अंनिस व विधान परिषदेच्या उप सभापती नीलम गोऱ्हे यांनी पोलीसांच्या लक्षात आणुन दिले.त्याप्रमाणे पोलीसांनी आरोपी संतोष पवार याच्या घराची झडती घेतांना जादुटोणाचे साहित्य मिळाले.नागाचा आकार असलेल्या खिळ्याला काळा बिबा आरपार केलेला आढळला. त्यासोबत गंडेदोरे व ताविज पण मिळाला. हे साहित्य कुठून आणले,अशी पोलीसांनी आरोपींकडे चौकशी केली असता त्यांनी भोंदुबाबाचे नाव सांगितले. मयत नेहा पवार ही माहेरवरुन राखेसारखी भस्माची पुडी आणत होती. त्यामुळे घरात अडचणी येतात. त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी व नेहाला भिती घालण्यासाठी जादुटोणा केल्याचे आरोपी संतोष पवार व जिजाबाई पवार यांनी सांगितले. त्यानुसार पोलीस निरीक्षक सुनील पवार यांनी नाशिकच्या हिरावाडी येथुन सुनिल बबन मुंजे (वय -४२ वर्ष )या मांत्रिकाला सोमवारी रात्री अटक केली.त्याने त्याच्या राहत्या घरी मंदिर व दरबार करुन लोकांच्या समस्यांवर दैवी व अघोरी इलाज करण्याचे काम करत तो होता. त्याने गुन्ह्यांची कबूली दिली आहे. पोलीसांनी त्याला सहआरोपी बनविले असुन जादुटोणा विरोधी कायद्याचे कलम लावले आहेत. न्यायालयात त्याला हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.अधिक तपास पोलीस निरीक्षक सुनील पवार करत आहे

सदर भोंदुबाबाने आणखी कुणाला फसविले त्याची चौकशी पोलीसांनी करावी. लोकांनी अशा अंधश्रद्धायुक्त प्रकारांपासुन दुर रहावे.कुणाची फसवणुक झाली असल्यास अंनिस किंवा पोलीसांशी संपर्क साधावा - कृष्णा चांदगुडे, राज्य कार्यवाह, अंनिस. ९८२२६३०३७८

# सामूहिक श्रमदानाचे शक्तिप्रदर्शन;

## अधिकारी, ग्रामस्थ एकत्र येत स्वच्छतेचा संदेश

**नगर तालुका | रयत समाचार**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पिंपळगाव माळवी येथे ग्रामस्वच्छता आणि विकास कामांना गती देण्यासाठी मोठ्या उत्साहात सामूहिक श्रमदान करण्यात आले. जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) दादाभाऊ गुंजाळ आणि गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांनी स्वतः हातात झाडू घेऊन प्राथमिक शाळा परिसरात स्वच्छता करून उपक्रमाची सुरुवात केली.



श्रमदानात गावातील मुख्य रस्ते, शाळा परिसर, अमरधाम, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे साफसफाई, झाडांची निगा राखणे आणि प्लास्टिक कचऱ्याचे संकलन अशी विविध कामे करण्यात आली. प्राथमिक शाळा व श्रीराम विद्यालयातील विद्यार्थ्यांसह गावातील मुख्य रस्त्यावरून फेरी काढून स्वच्छतेचा संदेश जनजागृतीद्वारे देण्यात आला.

यावेळी बोलताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ म्हणाले, समृद्ध पंचायत राज अभियान हे फक्त योजनेचे नाव नाही, तर गावकऱ्यांच्या मनात स्वच्छता आणि विकासाची ज्योत सतत प्रज्वलित ठेवण्याचे माध्यम आहे. अधिकारी, कर्मचारी मैदानात उतरले तर ग्रामस्थांनाही प्रेरणा मिळते.

गटविकास अधिकारी राजेंद्र देसले यांनी हा उपक्रम गावाच्या बदलाची सुरुवात असल्याचे सांगत, हा फक्त एक दिवसाचा उपक्रम नसून गावाचा कायापालट करण्याचे पाऊल आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाला सरपंच राधिका प्रभुणे, उपसरपंच मच्छिंद्र झिने, ग्रामपंचायत सदस्य बापू बेरड, सागर गुंड, प्राचार्य संभाजी पवार, मुख्याध्यापक गंगाधर लोंढे, मेजर विश्वनाथ गुंड, प्रगती महिला ग्राम संघ अध्यक्ष जयश्री साबळे, अंगणवाडी सेविका, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४३८१ मतदारांची दुबार नोंद;

## अभिषेक कळमकर यांची हरकत

**अहमदनगर | रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेतील दोन मतदारसंघांमध्ये आढळलेल्या गंभीर अनियमिततेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्यावतीने शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी मनपा आयुक्त व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. मतदार याद्यांतील या विसंगतीमुळे पारदर्शकता आणि निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून लोकशाही प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला.



निवेदनानुसार, श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघ आणि अहिल्यानगर महापालिकेच्या प्रारूप मतदार यादीत एकाच व्यक्तींची नावे मोठ्या प्रमाणात दिसून आली आहेत. तब्बल ४३८१ मतदारांची नावे श्रीगोंदा मतदारसंघात नोंदलेली असून त्याच नावांची नोंद अहिल्यानगर शहराच्या यादीतही असल्याचा धक्कादायक घोटाळा उघड झाला आहे. हा आकडा प्रशासनाच्या निष्पक्षतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभा करतो. कळमकर यांनी या प्रकरणाची दखल घेत प्रशासनाच्या भूमिकेवर कडक शंका व्यक्त केली. "अधिकारी कोणाच्या सांगण्यावरून तर हे करत नाहीत ना? इतक्या मोठ्या प्रमाणात विशिष्ट मतदारसंघातील नावे दुसऱ्या यादीत कशी आली? हा तांत्रिक दोष आहे की नियोजित प्रयत्न याचा स्पष्ट खुलासा प्रशासनाने करावा," अशी मागणी त्यांनी केली. कळमकर यांनी पुढे सांगितले की, जास्तीत जास्त दुबार नावे श्रीगोंदा मतदारसंघातील मांडवगण जिल्हा परिषद गटातून आढळली आहेत. एखाद्या विशिष्ट गटातील हजारो नावांची एकत्रित घुसखोरी हा अपघात नसून हातचलाखी असू शकते, असा त्यांचा दावा आहे.

# नरेंद्र मोदीने घेतली ऐतिहासिक अहमदनगरच्या देवव्रत रेखेची दखल

## 'दंडकर्म पारायणम'; वैदिक परंपरेला घातला मानाचा मुजरा

**काशी | रयत समाचार**

भारतीय वैदिक परंपरेचा तेजस्वी वारसा जपत ऐतिहासिक अहमदनगर तथा नूतन अहिल्यानगरमधील अवघ्या १९ वर्षांच्या देवव्रत महेश रेखे यांने शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेतील २००० मंत्रांचे 'दंडकर्म पारायणम्' यशस्वीरीत्या पूर्ण करून अभूतपूर्व कामगिरी केली. सलग ५० दिवस अखंड, शुद्ध मंत्रोच्चाराने पूर्ण झालेले हे पारायण वैदिक परंपरेतील अत्यंत कठीण आणि तपश्चर्यायुक्त मानले जाते, अशी माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फेसबुकवर पोस्ट करून दिली.

मोदी या पोस्टमधे म्हणाले, या पारायणात असंख्य वैदिक ऋचा, पवित्र शब्द, शास्त्रीय उच्चार आणि तपश्चर्या



यांचा समावेश असून, देवव्रत यांनी संपूर्ण विधी पूर्ण शुद्धता, एकाग्रता आणि शास्त्रोक्त पद्धतीने साध्य केला असल्याचे गुरुवर्गाने सांगितले.

काशीच्या पवित्र भूमीत ही साधना पूर्ण झाल्याने या उपलब्धीला अधिक आध्यात्मिक अधोरेखा मिळाल्याचे मानले जात आहे. स्थानिक संत, मुनि, वेदज्ञ व विविध संस्थांनी त्यांच्या या अनन्यसाधारण साधनेचे मोदी यांनी कौतुक केले

काशीचे लोकप्रतिनिधी म्हणून नरेंद्र मोदी म्हणाले, देवव्रत यांची ही तपश्चर्या भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. वैदिक परंपरेचा दीप त्यांनी अधिक उजळ केला आहे. त्यांच्या कुटुंबीय, गुरुवर्य आणि सहाय्यक संस्थांना मानाचा मुजरा.

ऐतिहासिक अहमदनगर (अहिल्यानगर)मधील देवव्रत रेखेच्या या यशामुळे वेदज्ञान शिकणाऱ्या सनातन वैदिक ब्राह्मणी तरुणांमध्ये प्रेरणा निर्माण झाली असून, भारतीय वैदिक संस्कृतीचे तेज आणखी उजळल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

## एआय प्रकल्पांनी उजळले

# प्रोग्रेस अकॅडमीचे विज्ञान प्रदर्शन

**अहमदनगर | आबिद खान**

नालबंदखुंट येथील प्रोग्रेस अकॅडमी आयोजित विज्ञान व तंत्रज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी आणि भविष्याभिमुख संकल्पनांना प्रत्यक्ष मॉडेल्सच्या माध्यमातून प्रभावी रूप दिले.

प्रदर्शनात फायर फायटर सिस्टम, स्मार्ट सिटी मॉडेल, डिझास्टर अलर्ट सिस्टम, गॅस लीकेज ट्रॅकर, ऑटोमॅटिक स्ट्रीट लाईट्स, वॉटर लेव्हल इंडिकेटर, क्लॅप कंट्रोल लाईट, तसेच स्मार्ट डस्टबिन,



स्मार्ट प्लांट वॉटरिंग सिस्टम, ऑब्स्टॅकल अव्हॉइडिंग रोबोट, होम ऑटोमेशन यांसारख्या प्रकल्पांचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले.

या प्रकल्पांचे परीक्षण आणि विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन मुफ्ती अल्ताफ मोमिन, डॉ. परवेज अशरफी, श्री. सोलापूरे, श्री. भंडारी, आमिर सय्यद, शर्फुद्दीन शेख, ॲड. तन्वीर आदी मान्यवरांनी केले. सर्वांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, वैज्ञानिक दृष्टीचे आणि मॉडेल्समधील तांत्रिक बारकाईचे भरभरून कौतुक केले.

प्रदर्शनाचे मुख्य संयोजक सलमान ताज बागवान म्हणाले, "विद्यार्थ्यांनी सादर केलेले हे प्रकल्प भविष्यातील तंत्रज्ञानाची दिशा दाखवणारे आहेत. त्यांची कष्टशीलता, कल्पनाशक्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन अत्यंत प्रशंसनीय आहे." विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हे प्रदर्शन अत्यंत यशस्वी ठरले. उपस्थित मान्यवर, पालक आणि नागरिकांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे मनापासून कौतुक केले.

# दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणणे सर्वांचे कर्तव्य– भंडारी

**अहमदनगर | रयत समाचार**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शहरातील विविध शाळा आणि संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम उत्साहात पार पडला. दरवर्षीप्रमाणे ३ डिसेंबर रोजी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातून काढण्यात आलेल्या प्रभातफेरीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

हा कार्यक्रम जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जानकीबाई आपटे मूकबधिर विद्यालय (अहिल्यानगर), अपंग संजीवनी मूकबधिर विद्यालय (सावेडी), मतिमंद विद्यालय (अहिल्यानगर), ज्योत्स्ना उद्योग केंद्र (अहिल्यानगर), राष्ट्रसंत



आनंदऋषीजी दिव्यांग शाळा (नेप्ती), मतिमंद विद्यालय (नेप्ती) आणि मतिमंद विद्यालय (तपोवन रोड) यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

प्रभातफेरीचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. विद्या जोशी, शिक्षण अधिकारी भास्कर पाटील, डी.डी.आर. सी. विळद घाटचे डॉ. दीपक अनाप, म.न.पा. प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, ॲड. लक्ष्मण पोकळे, राजेंद्र पोकळे, ॲड. राजाभाऊ शिर्के, आनंद कडूस आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रभातफेरीदरम्यान दिव्यांग विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा गांधी यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केले. टिळकरोड, माळीवाडा परिसरातून रॅलीचे मार्गक्रमण झाले. दिव्यांग विद्यार्थ्यांचा उत्साह आणि आनंद संपूर्ण रॅलीत जाणवत होता.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, १०० मीटर आणि २०० मीटर धावण्याच्या स्पर्धा, तसेच कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

कार्यक्रमात दिव्यांग दिनाचे महत्त्व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देविदास कोकाटे यांनी उपस्थितांना समजावून सांगितले. दिव्यांग हक्क कायदा २०१६ याबाबत ॲड. राजाभाऊ शिर्के यांनी सविस्तर माहिती दिली.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, "दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणणे हे आपणा सर्वांचे प्रथम कर्तव्य आहे. प्रशासन दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कटिबद्ध आहे." कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक विजय आरोटे आणि शिक्षकवर्ग यांनी केले. राजेंद्र पोकळे यांनी विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप केले. सुदाम चौधरी यांनी सूत्रसंचालन केले तर यू. आर. उंडे यांनी आभार मानले.




**दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक**
**गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे**

**ख्रिसमस विशेषांक**

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

- अतिथी संपादक -

सॅम्युअल वाघमारे

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

लेख, माहिती व जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

**रयत समाचार Classified छोटी जाहिरात**

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

## मोहटादेवी देवस्थान विश्वस्त बैठक

# सुविधांसह विकास आराखड्याला गती देण्याचा निर्णय



**पाथर्डी । नितीन गटाणी**

श्री मोहटादेवी देवस्थानच्या नवनियुक्त दहा विश्वस्तांची प्रथम परिचय बैठक प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. देवस्थानचे आगामी कामकाज, भाविकांना सोयीसुविधांची उपलब्धता आणि मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास या विषयांवर न्यायाधीश शेंडे यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. बैठकीत भाविक, मोहटे ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी रुग्णालय उभारणी, बाह्यरुग्ण सेवा तातडीने सुरू करणे, देवस्थानाची विविध माध्यमांतून व्यापक प्रसिद्धी वाढवणे, भाविकांशी माहितीपूर्ण संपर्क वाढवणे यावर चर्चा झाली. भाविकांच्या मागणीनुसार उत्सवमूर्तीवरील अभिषेक सेवा पुन्हा सुरू करणे, विविध धार्मिक पूजांची व्यवस्था उपलब्ध करणे, मोहटे ग्रामस्थांच्या सहभागाने वार्षिक उत्सवाचे आयोजन करण्यासाठी योजना तयार करणे यावर भर देण्यात आला. देवीच्या सुलभ दर्शनासाठी आधुनिक, शिस्तबद्ध दर्शनव्यवस्था उभारणे, तसेच राज्य व केंद्र शासनाच्या सहाय्याने मंदिर परिसराचा विकास करून भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. देवस्थानच्या उन्नतीसाठी संकल्पित कार्ययोजना तयार करून अंमलबजावणीस प्रारंभ करण्यावर सर्व विश्वस्त एकमत झाले. नवनियुक्त विश्वस्तांनी पदसिद्ध विश्वस्त तसेच न्यासाचे चेअरमन व जिल्हा न्यायाधीश महेश लोणे यांच्या नेतृत्वाखाली देवस्थानाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. भाविकांच्या सहकार्याने मंदिराच्या ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाला योग्य प्रतिष्ठा मिळवून देण्याची बांधिलकी व्यक्त करण्यात आली. बैठकीस बाबासाहेब दहिफळे, शशिकांत दहिफळे, शुभम दहिफळे, अशोक दहिफळे, राजेंद्र शिंदे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. कल्याण बडे, ॲड. प्रसन्न दराडे, श्रीकांत लाहोटी, ऋतिका कराळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. विक्रम वाडेकर यांनी केले. प्रास्ताविक शुभम दहिफळे, तर आभार प्रदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे यांनी केले.



# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

भारतीय लोकशाही मूल्यांचा गौरव करणारा संविधान दिन महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. "विविधतेतून एकतेचा संदेश देणारे भारतीय संविधान स्वातंत्र्य, समता, बंधुता, विज्ञाननिष्ठा आणि धर्मनिरपेक्षता या मूलभूत मूल्यांवर उभारलेले आहे. या मूल्यांमुळेच भारतीय लोकशाही अधिक समृद्ध झाली आहे," असे उद्गार महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे यांनी व्यक्त केले. संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. संजय फटे यांनी केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. महादेव जरे यांनी उपस्थितांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आयोजन राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अर्चना फुलारी, निवडणूक साक्षरता मंडळाचे प्रमुख व नोडल अधिकारी प्रो. डॉ. राजेंद्र ठाकरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख प्रा. भाऊ बुलाखे, प्रा. देवेंद्र बहिरम आणि प्रा. संजय फटे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. रमेश थोरात, डॉ. रावसाहेब काळे, डॉ. सुप्रिया पवार, प्रा. उंडे, प्रा. ससाणे, प्रा. इंगळे, प्रा. सिद्धार्थ बर्वे, प्रा. वैशाली घोडके, प्रा. रायकर, प्रा. नाना वागस्कर, प्रा. शेंडगे आदी प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मोरया चिंचोरे येथे कृषिकन्यांचे स्वागत



**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनई येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक कार्यक्रमांतर्गत मोरया चिंचोरे गावात दाखल झाल्या. ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच प्रतिभा साहेबराव इलक, ग्रामविकास अधिकारी नितीन पवार, कृषिसेवक श्रीमती दहिफळे आणि अलका आल्हाट यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले.

या गटात कृषीकन्या शरयु पवार, आदिती तागड, दिपाली शिंदे, भक्ती सोनवर, ऋतुजा वारे आणि भाविका वळवी यांचा समावेश आहे. या विद्यार्थिनी पुढील काही दिवस गावात राहून शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करतील तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत.

त्यांच्या उपक्रमांतर्गत गावामध्ये प्रत्यक्ष सर्वे क्षण करून शेतकऱ्यांच्या अडचणी, ग्रामीण जीवनमान, सामाजिक-आर्थिक स्थिती, नैसर्गिक साधनसंपत्ती, पीक पद्धती अशा विविध विषयांचा अभ्यास केला जाणार आहे. याशिवाय माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, पिकांवरील रोग व किड व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन, बीज प्रक्रिया आणि शेतीशी संबंधित समस्यांचे निराकरण या विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. प्रात्यक्षिके आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचाही समावेश असेल. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील वी. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल ए. दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. निर्मला एन. विधाते, डॉ. एस. बी. चौगुले, प्रा. श्रीकृष्ण एस. हुरुळे तसेच इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# कल्याणकारी योजनांच्या लाभासाठी ऑटोरिक्षा, टॅक्सी चालकांना सभासद नोंदणीचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**



राज्यातील ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालकांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने 'धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळ' स्थापन केले आहे. या मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी चालकांनी ऑनलाईन सभासद नोंदणी करावी, असे आवाहन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी सिद्धार्थ ठोके यांनी केले.

मंडळामार्फत चालकांसाठी जीवनविमा आणि अपंगत्व विमा योजना, आरोग्य सुविधा, कर्तव्यावर असताना झालेल्या दुखापतीसाठी ५० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य, पाल्यांसाठी शिष्यवृत्ती, तसेच कौशल्यवृद्धीसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे. या सर्व योजनांसाठी सभासद नोंदणी आवश्यक असून, अर्ज मंडळाच्या https://ananddighekalyankarimandal.org या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करायचा आहे. नोंदणी करताना वाहनाचा नोंदणी क्रमांक, परवाना, अनुज्ञप्ती, रेशनकार्ड, आधार व पॅन क्रमांक, तसेच कुटुंबातील सदस्यांची माहिती नमूद करावी. आवश्यक कागदपत्रांचे फोटो अपलोड झाल्यानंतर अर्ज संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे पडताळणीसाठी पाठवला जातो. अटींची पूर्तता झाल्यास अर्ज मंजूर केला जातो; त्रुटी असल्यास संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा.

अर्ज मंजूर झाल्यानंतर सभासद नोंदणी शुल्काबाबतचा संदेश अर्जदाराच्या मोबाईलवर प्राप्त होतो. शुल्क भरण्यापूर्वी नोंदणी स्थिती तपासण्यासाठी https://ananddighekalyankarimandal.org / home / checkstatus ही लिंक उपलब्ध आहे. सभासद नोंदणी शुल्क ५०० रुपये आणि वार्षिक शुल्क ३०० रुपये असून, एकूण ८०० रुपये भरल्यानंतर नोंदणी प्रक्रिया पूर्ण होते. त्यानंतर "अभिनंदन! आपण सभासद झाले आहात" असा पुष्टी संदेश पाठवला जातो. नोंदणीची पावती डाउनलोड करून सुरक्षित ठेवावी, अशी माहिती परिवहन विभागाने दिली.

# आठ वर्षांनंतर ७५.६३ टक्के मतदारांनी बजावला हक्क

**जामखेड । रिजवान शेख**

जामखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर झालेली मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पूर्णपणे शांततेत पार पडली. नगरपरिषद क्षेत्रातील १२ प्रभागांतील ४१ मतदान केंद्रांवर सकाळपासून मतदारांची उत्स्फूर्त गर्दी पाहायला मिळाली.

नगरपरिषदेत एकूण ३३,१६१ नोंदणीकृत मतदार असून त्यापैकी २५,०८१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सरासरी मतदान टक्केवारी ७५.६३ टक्के नोंदली गेली. मतदान करणाऱ्या मतदारांमध्ये १२,८५९ पुरुष आणि १२,२२२ महिला मतदारांचा समावेश आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी नितीन पाटील तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजय साळवे यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडल्याची माहिती दिली. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू न देता प्रशासन आणि पोलिसांनी योग्य समन्वय ठेवत निवडणूक पार पाडली. दरम्यान, निवडणूक विभागाकडून प्रभागनिहाय मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यात आली असून प्रत्येक प्रभागात मतदारांचा चांगला सहभाग दिसून आला. प्रभागनिहाय मतदानाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे : प्रभाग क्र. १ : २५९३, प्रभाग २ : २४१३, प्रभाग ३ : १६०१, प्रभाग ४ : १५६७, प्रभाग ५ : १८०४, प्रभाग ६ : १८९५, प्रभाग ७ : १७०८, प्रभाग ८ : १८०२, प्रभाग ९ : २४०४, प्रभाग १० : २३७३, प्रभाग ११ : २४०८, प्रभाग १२ : २५१३. एकूण मतदान २५,०८१ मतदारांनी केले. जामखेडमध्ये शांत, उत्साहपूर्ण आणि नियोजनबद्ध वातावरणात मतदान पार पडल्याने निवडणूक प्रक्रियेबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

## ज्येष्ठ लोककलावंत

# संपत भालेराव यांचे निधन

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**



हिवरगाव पावसा येथील ज्येष्ठ संबळ वादक संपत विश्राम भालेराव (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. महाराष्ट्राच्या लोककला परंपरेतील संबळ वादनाला त्यांनी आयुष्यभर वाहून घेतले. तब्बल ५० वर्षे त्यांनी विविध कार्यक्रमांमधून संबळ वादनाची मंत्रमुग्ध करणारी सादरीकरणे केली. संपत भालेराव आपल्या अनोख्या शैलीसाठी परिचित होते. गावातील कलावंतांचा वारसा पुढे नेत त्यांनी कष्ट, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर स्वतःचे कलाजग निर्माण केले. "संगीत हाच ध्यास आणि श्वास" हा मंत्र त्यांनी आयुष्यभर जपला.

घरची परिस्थिती कठीण असताना पत्नी सुनंदा, मुलगे चंद्रकांत व सूर्यकांत, मुलगी जयश्री यांच्या सहकार्याने त्यांनी कोरडवाहू जमिनीवर शेती उभारली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हिवरगाव पावसा परिसरात शोककळा पसरली. अंत्यविधी गुरुवार, ४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वा. हनुमान मंदिरासमोरील सामाजिक सभागृहाजवळ होणार आहे.

# ठाकूर निमगाव येथे दत्त महापुराण कथेची सांगता

**शेवगाव । लक्ष्मण मडके**



ठाकूर निमगाव येथे दत्त जयंतीनिमित्त प्रथमच आयोजित दत्त महापुराण कथा उत्साहात पार पडली. ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबरदरम्यान सायंकाळी ७ ते ९ या वेळेत कथा आयोजित करण्यात आली. ह.भ.प. दृष्टीभूषण तुकाराम भगत यांनी भाविकांना दत्त भक्ती, संस्कार, अध्यात्मिक उन्नती आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. कथा कालावधीत भजन, हरिपाठ, वाद्यसंगत आणि विविध धार्मिक उपक्रमांनी वातावरण अधिक भक्तिमय झाले. कथेस उपस्थितांमध्ये प्रकाश कातकडे, राजू कातकडे, सतीश फरताळे, सुदामदेव शास्त्री, दीनकर चिमणे, रामगिरी महाराज, उद्धव सबलस, राम झिंजुर्के, विकास झिरपे, खंडू आबा सानप, मारुती झिरपे, ऋषिकेश थोरात, ज्ञानेश्वर सबलस, निलेश वाणी, पांडुरंग झुंबड, गणेश बरडे, नामदेव भगत, श्रीराम उदागे, प्रवीण कोरडगावकर, शेखर मुरदारे, भागवत उगले, पांडुरंग झुंबड, महेश नरोडे, चंद्रकांत झिरपे यांचा समावेश होता. वाद्य व भजनसंगती देणाऱ्यांमध्ये ऋषी महाराज झिरपे (मृदुंग), तेजस महाराज नरोडे, रेवणनाथ महाराज शेंबडे (भजन), देवदत्त महाराज अन्दुरे (तबला), राजू महाराज काते (पेड) यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला. या अध्यात्मिक सोहळ्यामुळे गावात श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश दृढ झाला असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# पंचगंगा शुगरकडून ऊस बिले खात्यात वर्ग

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

महालगाव येथील पंचगंगा शुगर अँण्ड पॉवर प्रा. लि. कारखान्याने द्वितीय गळीत हंगामातील १ ते १५ नोव्हेंबरदरम्यान गाळपासाठी आलेल्या ऊसाचे पंधरवाड्याचे बिल ३०५० आणि ३१५० रुपये प्रति टन प्रमाणे गणना करून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ता. १ डिसेंबर रोजी जमा केले असल्याची माहिती चेअरमन प्रभाकर शिंदे यांनी दिली.

शिंदे म्हणाले की, "शेतकरी प्रथम हीच आमची भूमिका असून ऊसबिलांची वेळेवर तरतूद करण्यासाठी पंचगंगा व्यवस्थापन कटिबद्ध आहे. बिलाची रक्कम पारदर्शक पद्धतीने व वेळेत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा व्हावी यासाठी वित्त विभाग आणि सर्व खातेप्रमुख सज्ज आहेत.

आम्ही ही परंपरा पुढेही कायम ठेवणार आहोत." कारखान्याच्या माहितीनुसार २६५ वाणाला ३०५० रुपये, तर अधिक रिकव्हरी देणाऱ्या विविध वाणांना ३१५० रुपये प्रमाणे पंधरवाडा देयक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. पारदर्शक वजन, विश्वासार्ह सेवा आणि वेळेवर देयक देण्याच्या धोरणामुळे पंचगंगाबद्दल परिसरातील ऊस उत्पादकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

पंचगंगा साखर कारखान्याच्या या तातडीच्या देयकामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील आर्थिक गरजांसाठी मोठा दिलासा मिळाल्याचेही शिंदे यांनी सांगितले. ऊसबिल १५ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कारखान्याची परंपरा यंदाही पाळली आहे. आगामी दिवसांत जास्तीत जास्त ऊस गाळपासाठी पाठविण्याचे आवाहनही चेअरमन शिंदे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना केले.

# शहरात दिव्यांग दिन उत्साहात साजरा

**अहमदनगर । रयत समाचार**

मनपा शिक्षण विभाग, रिमांड होम व प्रगत माध्यमिक विद्यालयात दिव्यांग दिन समता दिन म्हणून साजरा झाला. शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी "प्रत्येक दिव्यांग विद्यार्थी वेगळ्या प्रतिभेचा धनी" असल्याचे सांगितले. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, क्रीडा, नृत्य, गायन व ब्रेल लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. तनुजा पवारचे नृत्य आणि कलेश्वर लोहारप्रशांत काते यांचे गायन आकर्षण ठरले. विजेत्यांना ट्रॉफी व प्रशस्तिपत्रके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात मनपा अधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध धंद्यांविरोधात आमदार काळेंचे निवेदन म्हणजे अपयशाची कबुली आढाव

**कोपरगाव । किसन पवार**



कोपरगाव शहरात वाढत चाललेल्या अवैध धंद्यांविरोधात आमदार आशुतोष काळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिल्यानंतर स्थानिक राजकारणात चांगलाच वाद पेटला आहे. भाजप शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी आमदार काळेंवर टीकास्त्र सोडत, "अवैध धंदे त्यांच्या कार्यकाळात वाढले, यावर त्यांनी स्वतःच शिक्कामोर्तब केले आहे," असा आरोप केला.

आढाव यांनी म्हटले की, कोपरगाव शहरात जुगार, मटका, अवैध दारू विक्री, गुटखा व्यापार, ऑनलाईन बेटिंग, वाळूचोरी यांसारख्या अवैध व्यवसायांचे प्रमाण वाढले असून तरुणाईची दिशाभूल होत आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना पोलिस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याची टीका त्यांनी केली.

काही अवैध धंद्यांमध्ये आमदार काळे यांच्या निकटवर्तीयांचा सहभाग असल्याचा आरोपही आढाव यांनी केला. चक्री, बिंगो प्रकरण, गोळीबार प्रकरण आणि अलीकडील सोने चोरीप्रकरणात कोणाची नावे समोर आली, हे सर्वांना ज्ञात असूनही आमदारांनी उलट आरोप करून स्वतःच्या नेतृत्वातील कमतरता झाकण्याचा प्रयत्न केला, असा टोला त्यांनी लगावला.

"शहरात दहशत माजवणारा पी.ए. नेमका कुणाचा? रेशन घोटाळ्यात आरोप कोणावर? जुगार अड्डे कोणाच्या कार्यकर्त्यांचे?" असे सवाल उपस्थित करत आढाव म्हणाले की, 'उलटा चोर कोतवाल को डांटे' ही म्हण कोपरगावात तंतोतंत लागू पडत आहे.

निवडणूक काळातच उपमुख्यमंत्र्यांकडे धाव घेण्यामागे राजकीय हेतू असल्याचा संशयही आढाव यांनी व्यक्त केला. "नागरिकांच्या तक्रारींकडे अनेक वर्षे दुर्लक्ष करणारे आमदार काळे अचानक सक्रिय का झाले? व्यावसायिकांवर दबाव आणून राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न तर नाही ना?" असा प्रश्न त्यांनी केला.

या घडामोडींमुळे कोपरगावातील राजकीय वातावरण तापले असून अवैध धंद्यांच्या मुद्द्यावरून आरोपप्रत्यारोपांची मालिका रंगू लागली आहे.

# भारतीय नौदल दिन

आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ता. ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो? हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल. नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले. त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली. भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला. पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# ४८४ अग्निवीरांचा दीक्षांत समारंभ उत्साहात

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमध्ये प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४८४ अग्निवीर जवानांचा दीक्षांत समारंभ प्रमुख पाहुणे मेजर जनरल हरी भास्करन पिल्लाई यांच्या उपस्थितीत झाला. राष्ट्रीय ध्वज आणि रेजिमेंटल ध्वज यांच्या साक्षीने अग्निवीर जवानांनी देशसेवेची शपथ घेऊन आपली वाटचाल सुरू केली.

अग्निवीर जवानांनी मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमध्ये ३१ आठवड्यांचे कडक आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण पूर्ण केले. समारंभात जवानांनी शानदार संचलन करत प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. संचलनाचे नेतृत्व पवन यल्लाकुरी यांनी केले.प्रशिक्षण काळात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अग्निवीर जवानांना मेजर जनरल हरी भास्करन पिल्लाई यांच्या हस्ते पदके प्रदान करण्यात आली. युद्ध स्मारकाला अभिवादन करून समारंभाची सांगता करण्यात आली.दीक्षांत समारंभाला मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरचे कमांडंट ब्रिगेडियर जॉयदीप मुखर्जी, अधिकारी तसेच अग्निवीर जवानांचे कुटुंबीय उपस्थित होते.



# थंडीची लाट

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यात कडाक्याची थंडी वाढत असून किमान तापमान १० पेक्षा कमी नोंदवले जात आहे. हवामान विभागाने २ ते ४ डिसेंबर २०२५ दरम्यान जिल्ह्यात काही ठिकाणी तीव्र थंडीच्या लाटेची शक्यता व्यक्त करत यलो अलर्ट जारी केला आहे. नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांनी केले.जिल्हा प्रशासनाने नागरिकांना स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले असून, आपत्कालीन स्थितीत नजीकचे आरोग्य केंद्र किंवा १०८ टोलफ्री क्रमांकावर संपर्क साधण्याची माहिती दिली

# ससाणे की बिहाणी? नगराध्यक्षपदाच्या शर्यतीवर जनतेत उत्सुकता

## मुस्लिम मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार?

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

**नगरपालिका निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाल्यानंतर नगराध्यक्षपदाच्या लढतीत कोण आघाडी घेणार, याबाबत शहरात दिवसभर चर्चा रंगल्या. ८० टक्क्यांपेक्षा अधिक मतदानाची अपेक्षा असताना मृत, दुबारतिबार नावे तसेच बाहेरगावी असलेले मतदार यामुळे मतदानावर परिणाम झाला आणि टक्केवारी घटल्याची चर्चा सर्वत्र होती.** शहरातील ८०,९९२ पैकी ५३,९५४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. यातील प्रभाग क्रमांक ५, ६, ७ आणि ८ या मुस्लिमबहुल प्रभागांमध्ये १३,९५५ इतके मतदान झाले, तर उर्वरित प्रभागातून ३९,९९९ इतके मतदान झाले. ही कमी टक्केवारी काँग्रेसला फायद्याची ठरू शकते, असा अंदाज



राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

काँग्रेसचे उमेदवार करण ससाणे हे शहरातील प्रत्येक प्रभागात परिचित असून, माजी आमदार जयंत ससाणे व माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे यांची राजकीय परंपरा त्यांना बळ देणारी ठरत आहे. दुसरीकडे भाजपचे उमेदवार श्रीनिवास बिहाणी हे तुलनेने नवखे असल्याने ससाणेंना आघाडी मिळेल, असे अनेकांचे मत आहे. परंतु, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी निवडणुकीत घेतलेला सक्रिय सहभाग आणि राबविलेल्या यंत्रणेच्या जोरावर बिहाणीही विजयी ठरू शकतात, असा अंदाजही व्यक्त केला जात आहे.

या दोघांच्या लढतीत शिवसेनेचे प्रकाश शिंदे तिसऱ्या क्रमांकावर राहतील, असा अपेक्षित अंदाज मतदार व्यक्त करीत आहेत. शिंदे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवली; मात्र श्रीरामपूरच्या सामाजिक रचनेत हा मुद्दा फारसा प्रभावी ठरला नाही, अशीही चर्चा आहे. काही भागांमध्ये शिवसेनेची यंत्रणा कमकुवत राहिल्याचा फटका त्यांना बसू शकतो, असा अंदाजही राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे

यामध्ये सर्वाधिक मतदान प्रभाग ८ मध्ये झाले असून, येथे मतदारसंख्या सर्वाधिक होती. अनेक प्रभागांत चुरशीची लढत झाली असून अपक्ष उमेदवारांनी काही ठिकाणी समीकरणे गुंतागुंतीची केली आहेत. हे अपक्ष कोणाचा ''टांगा पलटी'' करतात, याकडेही शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

आता ससाणेबिहाणी यापैकी नगराध्यक्षपदाची बाजी कोणी मारते, हे येत्या २१ डिसेंबरला स्पष्ट होणार आहे.

शहरातील १७ प्रभागांतील मतदान पुढीलप्रमाणे झाले. १)३०९०, २) ३२५६, ३) २७५३, ४) ३४८४, ५) २७४८, ६) ३२६९, ७) ३६६५, ८) ४२७३, ९) ३०७५, १०) २८५६, ११) २९९७, १२) ३०११, १३) २८६०, १४) २८९५, १५) २९४५, १६) ३३९१, १७) ३३८६.

# पिक विमा मार्गदर्शन शिबीर संपन्न



**शेवगाव । नरहरी शहाणे**

तालुक्यातील गदेवाडी येथे प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत शेतकऱ्यांसाठी जागृती व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रब्बी हंगामातील पिकांचे नैसर्गिक आपत्तींमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी पिक विमा योजना कशी उपयुक्त ठरते याबाबत या कार्यक्रमात शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. भारतीय कृषी विमा कंपनीचे तालुका पिक विमा प्रतिनिधी नरहरी शहाणे यांनी शेतकऱ्यांना पिक विमाच्या अटी, लाभ, विमा उतरवण्याची प्रक्रिया, आपत्तीजन्य परिस्थितीत भरपाई मिळण्याची पद्धत याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पिक विमा योजना शेतकऱ्यांसाठी संरक्षण कवच असून, अनिश्चित हवामानामुळे होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून पिकांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने विमा उतरवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनीही विविध शंकांचे समाधान करून घेतले. कार्यक्रमात शहाणे यांनी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील आपल्या पिकांचा विमा उतरवून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.गदेवाडी येथील शेतकरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.


**दैनिक रयत समाचार**
**अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...**
**त्वरित नियुक्त करणे आहेत**
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
**आम्ही काय देणार**
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.


**किस्से निवडणुकीचे...**
**सलीमखान पठाण**

# सर्वांचा प्रसाद घेऊन, मगच मतदान




मंगळवारी झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मतदानाच्या दिवशी अनेक गमती जमती घडल्याच्या सुरस कथा आता ऐकायला मिळत आहे. यावेळी शहरात प्रामुख्याने तिरंगी लढत असल्याने व काँग्रेस महाविकास आघाडी, भाजपा राष्ट्रवादी युती व एकनाथ शिंदे सेना या तिरंगी पक्षात लढत झाल्याने प्रत्येक भागामध्ये विरोधक प्रबळ होते त्यामुळे मतदारांना प्रसाद वाटप करताना समर्थकांना सर्व प्रकारची काळजी घ्यावी लागत होती. यासाठी सोमवारी रात्री उशिरा काही भागांमध्ये एका पक्षाने मतदारांना रात्री झोपेतून उठवून प्रसाद वाटप केले व सकाळी लवकर मतदान करावे असे आवाहन देखील केले. मतदारांनी देखील त्यांना हो सकाळीच करू असे बिनधास्त आश्वासन दिले. सकाळी दुसऱ्या पक्षाचे लोक प्रसाद घेऊन आले त्यांचा ही लाभ मतदारांनी घेतला आणि तिसऱ्या पक्षाच्या प्रसादाची आतुरतेने वाट पाहत बसले. पण तिसऱ्या घटकाचा लाभ दुपारपर्यंत देखील न मिळाल्याने मतदार घरीच थांबले. दुपारनंतर काही भागांमध्ये तिसऱ्या पक्षाचा प्रसाद देखील मिळाला आणि मग मतदारांनी लांबच लांब रांगा लावल्या त्यामुळे मतदान रात्री उशिरापर्यंत चालले.

ज्यांना या प्रसादाची अपेक्षा नव्हती अशा सर्व मतदारांनी सकाळी जाऊन अकरा वाजेच्या आत मतदान करून टाकले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुशिक्षित समजला जाणारा शहरातील मतदार हा मतदान केंद्राकडे फिरकला नाही कारण त्याच्या नजरेमध्ये त्याच्या प्रभागातील कोणताच उमेदवार पात्र नव्हता.खरंतर या मतदारांनी आपली नाराजी नोटा बटनावर मतदान करून दाखवून द्यायला पाहिजे होती .पण त्यांनी सरळ मतदान करण्यास नकार दिला त्यामुळे देखील मतदानाची टक्केवारी कमी झाली.

# श्रीकांत ढेरंगे यांचा 'चित्रक' कवितासंग्रह प्रकाशनाच्या मार्गावर


## हस्ताक्षर प्रकाशन गृहाकडून वाचकांसाठी भेट

**पुणे । रयत समाचार**

समकालीन मराठी कवितेत आपल्या अभिव्यक्तीने वेगळी ओळख निर्माण करणारे कवी श्रीकांत ढेरंगे यांचा नवीन कवितासंग्रह 'चित्रक' हस्ताक्षर प्रकाशन गृहातर्फे लवकरच वाचकांसमोर येत आहे. आधुनिक काळातील उच्छाद, मानवी संवेदना, निसर्गनाश, आणि अंतर्मनातील संघर्ष या विषयांना सामोरे जाणारी ही कविता वाचकाला वास्तवाच्या कडवट पण आवश्यक जाणीवा करून देते.

संग्रहाचा आकार ५.५ ८.५, तर पृष्ठसंख्या १६० असून मूळ किंमत २९९ रुपये आहे. मात्र प्रकाशनपूर्व विशेष सवलतीत हा संग्रह २४० रुपये (पोस्टेजसहित) इतक्या किमतीत १५ डिसेंबरपर्यंत उपलब्ध आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ राजू बाविस्कर यांचे आहे.

कवी श्रीकांत ढेरंगे यांच्या कवितेतून आजच्या काळातील मनुष्यनिर्मित संकटांवरील तीक्ष्ण निरीक्षणे, नष्ट होत जाणाऱ्या निसर्गाविषयीची खोल वेदना, तसेच परिस्थितीशी लढण्याच्या सकारात्मक ऊर्जेचा विश्वास प्रकर्षाने जाणवत राहतो. ही कविता आपल्या भूप्रदेशातील संदर्भांमधून जागतिक वेदनाही व्यक्त करते; म्हणून तिचे भान वैश्विक आहे, अशी नोंद




समीक्षक प्रवीण दशरथ बांदेकर यांनी केली आहे.

आजच्या मराठी कवितेत क्वचित दिसणारे 'कवितेचे विशुद्ध भावरूप' या संग्रहात दिसते, असेही बांदेकर म्हणतात. आपल्या काळाशी भिडणारी, संवेदनशील आणि मनाला चटका लावणारी ही कविता 'चित्रक' या संग्रहातून वाचकांपर्यंत पोहोचणार आहे.

**बुकिंगसाठी संपर्क : ९०९६९९९८६५**
**बुकिंग कालावधी १५ डिसेंबरपर्यंत आहे.**

# ५ डिसेंबरला वनराईच्या वार्षिक विशेषांकाचे प्रकाशन

पुणे । रयत समाचार

पर्यावरण संवर्धन क्षेत्रात अग्रणी असलेल्या वनराई संस्थेचा शाश्वत देवराई या विषयावर आधारित वार्षिक विशेषांक प्रकाशन सोहळा पुण्यात उत्साहात पार पडणार आहे. वनराईचे संस्थापक पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया आणि ज्येष्ठ वन्यजीवतज्ज्ञ डॉ. वामन वर्तक यांच्या जयंतीनिमित्त हे प्रकाशन करण्यात येणार. सोहळ्याचा शुभारंभ ज्येष्ठ मानववंशशास्त्रज्ञ डॉ. के. टी. मल्लोत्रा यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थ ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ भूषविणार आहे. संस्थाध्यक्ष रविंद्र धारिया आणि सचिव अमित वाडेकर पाहुण्यांचे स्वागत करणार असून वनराईच्या कार्याचा आढावा घेत सामूहिक प्रयत्नांतून शाश्वत देवराईची संकल्पना देशभर रुजत आहे, याचा अभिमान आहे, असे सांगितले. कार्यक्रमात पर्यावरण संरक्षण, जैवविविधता, ग्रामीण विकास आणि लोकसहभाग यांवरील लेख, संशोधन आणि प्रात्यक्षिक माहिती असलेल्या विशेषांकाचे अनावरण झाले. पर्यावरणप्रेमी, स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

स्थळ : वनराई मुख्यालय, निर्भीडकर चौक, पर्वती, पुणे
दिनांक : शुक्रवार, ५ डिसेंबर २०२५
वेळ : संध्याकाळी ५.०० वा.

# जिल्ह्यात श्रीगोंदा अव्वल ७९.८४ टक्के मतदान

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

नगर परिषद निवडणुकीत ७९.८४ टक्के मतदानाची नोंद झाली. सकाळच्या सत्रात मतदानाचा वेग संथ होता; मात्र दुपारनंतर मतदारांनी मोठ्या प्रमाणावर केंद्रांवर गर्दी केली. काही मतदान केंद्रांवर ईव्हीएममध्ये तांत्रिक अडचणी आल्यामुळे रात्री उशिरापर्यंत मतदान प्रक्रिया सुरू ठेवावी लागली.

नगर परिषद क्षेत्रात एकूण २८,३२६ मतदार नोंदवले असून, यापैकी ११,५३७ पुरुष आणि ११,०७८ महिला अशा मिळून २२,६१५ मतदारांनी मतदानाचा अधिकार बजावला, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी दिली.

प्रभागनिहाय मतदानात प्रभाग क्रमांक १ मध्ये १,८४४, प्रभाग २ मध्ये १,८२५, प्रभाग ३ मध्ये १,७१६, प्रभाग ४ मध्ये २,२२८, प्रभाग ५ मध्ये १,८८३, प्रभाग ६ मध्ये २,००२, प्रभाग ७ मध्ये १,९६८, प्रभाग ८ मध्ये २,२०६, प्रभाग ९ मध्ये २,६७१, प्रभाग १० मध्ये २,२७७ आणि प्रभाग ११ मध्ये २,४९३ मतदारांनी मतदान केले. काही प्रभागांत मतदारांची उपस्थिती उत्साहवर्धक होती, तर काही ठिकाणी संथ मतदानामुळे निवडणूक कर्मचारी सतर्क राहून काम पाहत होते.

एकूणच, श्रीगोंद्यातील नागरिकांनी निवडणुकीबद्दल सकारात्मक प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला.

# कृषी विद्यापीठात टेनिस क्रिकेट स्पर्धेची निवड चाचणी

## खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

**राहुरी । रयत समाचार**

अहिल्यानगर टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १९ वर्षांखालील मुलेमुलींसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणी व टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा शनिवार, ता. ६ डिसेंबर रोजी राहुरी कृषी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर घेण्यात येणार आहे.सकाळी १० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार असून जिल्ह्यातील टेनिस क्रिकेट खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेचे जिल्हा सचिव तथा राज्य टेनिस क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार घन:श्याम सानप, अध्यक्ष केशव नागरगोजे आणि खजिनदार संदीप घावटे यांनी केले आहे.या स्पर्धेद्वारे नगर जिल्ह्याचा अधिकृत टेनिस क्रिकेट संघ जाहीर करण्यात येणार असून हा संघ १८ ते २१ डिसेंबरदरम्यान सातारा येथे होणाऱ्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी रवाना होईल. यंदाच्या वर्षापासून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना या खेळाद्वारे बोर्ड परीक्षेसाठी खेळ गुण मिळण्याचीही सुविधा उपलब्ध झाली आहे.स्पर्धेत सहभागी होताना सर्व खेळाडूंनी जन्मदाखला आणि आधार कार्ड सोबत आणणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी घन:श्याम सानप यांच्या ९८५०७४४५७६ किंवा ८६६८८२०२३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले.